



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : २९८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०९ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# भाजपच्या विरोधात इंडिया आघाडी फेल, आता ‘मेगा काँग्रेस’ पक्षासाठी प्रयत्न ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात सत्ताधारी भाजपसमोर तगडं आव्हान उभं करण्यासाठी विरोधकांकडून नव्याने मोर्चेबांधणी करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

इंडिया आघाडी मजबूत असल्याचा संदेश देण्यासाठी काँग्रेसने देशभरातील विरोधी पक्षांना साद घालत आज बैठक बोलावली होती. या बैठकीला भाजपविरोधातील २३ राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील, असा विश्वास काँग्रेसकडून व्यक्त करण्यात आला होता. तर दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी विरोधकांच्या बळकटीसाठी सुचवलेल्या नव्या उपायाची आणि त्यानंतर घडलेल्या विविध घडामोडींचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगत आहे.



भाजपचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेस पक्ष ताकदवान झाला पाहिजे आणि यासाठी काँग्रेसमधून फुटून गेलेल्या नेत्यांनी पुन्हा आपले पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करायला हवेत, असं वक्तव्य राऊत यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्यानंतर काँग्रेसकडून अशा प्रकारचे प्रयत्न सुरू झाल्याचंही बोललं जात असून काँग्रेस हायकमांडने याबाबत ममता बॅनर्जी यांना संपर्क केल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीचं भवितव्य, प्रादेशिक पक्ष खरंच काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात का आणि यातून मेगा काँग्रेस उभी राहू शकते का, अशा चर्चांना आता उधाण आलं आहे.

**भाजपचा मुकाबला करण्यात इंडिया आघाडी अपयशी**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काही महिने आधी भाजपशी दोन हात करण्यासाठी विरोधकांनी एकजूट दाखवत इंडिया आघाडीची स्थापना केली. मात्र आधी ठोस कार्यक्रमाचा अभाव आणि नंतर निवडणूक येता-येता या आघाडीतील काही महत्त्वाचे पक्ष काँग्रेसपासून वेगळे झाल्याने या आघाडीला निवडणुकीत फारसं यश मिळालं नाही. परिणामी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएने तिसऱ्यांदा सत्ता काबीज केली. निवडणुकीतील पराभवानंतर इंडिया आघाडीतील मतभेद आणखी तीव्र झाले आणि ममता बॅनर्जींसह विविध नेत्यांनी जाहीरपणे काँग्रेसवर टीकास्त्र सोडले. महाराष्ट्रातही महाविकास आघाडीच्या नावाने काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांनी भाजपसमोर आव्हान निर्माण केलं होतं. मात्र कालांतराने आधी शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी या राजकीय पक्षांमध्ये उभी फूट पडली आणि या दोन्ही पक्षांतील मोठा गट भाजपसोबत सत्तेत जाऊन बसला. त्यामुळे एकीकडे राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडी खिळखिळी झालेली असताना राज्यातही महाविकास आघाडीची स्थिती नाजूक झाली.

**काँग्रेसमधून बंड, नेत्यांनी स्थापन केलेल्या प्रादेशिक पक्षांची स्थिती काय?**

काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वासोबतच्या मतभेदांना कंटाळून काँग्रेसमधील अनेक दिग्गज नेत्यांनी पक्षापासून फारकत घेत आपल्या स्वतंत्र राजकीय पक्षांची स्थापना केली. यामध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस, शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी, जगनमोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील वायएसआर काँग्रेस अशी काही ठळक उदाहरणं आहेत. मात्र मागील काही वर्षांत या सर्वच पक्षांची स्थिती फारशी चांगली नसल्याचं दिसत आहे. यातील बहुतांश पक्षांनी आपआपल्या राज्यातील सत्ता गमावल्याचं पाहायला मिळतं.

**कोणत्या पक्षाची स्थिती काय?**

**तृणमूल काँग्रेस**
लोकसभा - २९ खासदार
राज्यसभा - १३ खासदार
आमदार - ८०

**राष्ट्रवादी शरदचंद्र पवार**
लोकसभा - ८ खासदार
राज्यसभा - २ खासदार
आमदार - १० खासदार

**वायएसआर काँग्रेस**
लोकसभा - ४ खासदार
राज्यसभा - ७ खासदार
आमदार - ११

**पीडीपी**
लोकसभा - ०
राज्यसभा - ०
आमदार - ३

**एनआर काँग्रेस**
लोकसभा - ०
राज्यसभा - ०
आमदार - १०

**इंडिया आघाडी मजबूत करण्यासाठी का होतायत प्रयत्न, आघाडीचं भवितव्य काय?**

इंडिया आघाडीबाबत सध्या राष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नांबाबत आम्ही राजकीय विश्लेषक अभिजीत ब्रह्मनाथकर यांचे मत जाणून घेतले. यावर बोलताना ते म्हणाले की, भाजप सध्या देशातील १८ पेक्षा जास्त राज्यात स्वबळावर सत्तेत असून ५ राज्यांत मित्रपक्षांच्या साथीने सत्तेत आहे. अशा स्थितीत भाजपविरोधात २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरताना एकजूट असण्याची गरज विरोधकांनी ओळखली आहे. भाजपविरोधात लढताना काँग्रेस मजबूत असेल तरच विरोधकांच्या आघाडीचा निभाव लागेल, ही गरज ओळखून जुन्या नेत्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये घरवापसी करायला हवी, असं आवाहन संजय राऊत यांनी केलं आहे. हा अस्तित्वाचा प्रयत्न असल्यानेच विरोधकांकडून एकजूट दाखवली जात आहे, असं ब्रह्मनाथकर यांनी म्हटलं.

नरेंद्र मोदींच्या समोर समर्थ पर्याय देण्यासाठी आपण एकवटलो तरंच २०२९ ची लढाई लढली जाऊ शकते, हे विरोधकांना उमगलं आहे. त्याच पर्यायावर विरोधक काम करत असून इंडिया आघाडीचं भवितव्य हे त्यांच्या जागावाटप आणि एकीवर अवलंबून आहे. ते जर भांडत राहिले तर जे २०२४ झालं तेच २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत होईल, असा अंदाजही अभिजीत ब्रह्मनाथकर यांनी वर्तवला आहे.

दरम्यान, एकीकडे इंडिया आघाडीचं बळकटीकरण आणि दुसरीकडे सोडून गेलेल्या नेत्यांची घरवापसी, अशी दुहेरी कसरत आगामी काळात काँग्रेसला करावी लागणार आहे. या प्रयत्नात काँग्रेसला यश येतं की भाजप पुन्हा धोबीपछाड देणार, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

---

## बचत गटातील महिलांची १.४० कोटींची फसवणूक

### ‘दिव्यज्योत’ च्या अध्यक्षा सुनीता कांबळे यांना ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून बचत गटांतील महिलांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी ’दिव्यज्योत’ संस्थेच्या अध्यक्षा सुनीता संतोष कांबळे यांना पोलिसांनी अटक केली आहे. रविवारी (दि. ७) त्यांना निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

प्राथमिक तपासानुसार, या घोटाळ्यात सुमारे २ हजार महिलांची तब्बल १ कोटी ३९ लाख ५१ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

**शिवणकाम, ब्युटी पार्लरच्या नावाखाली गंडा**

लासलगाव आणि परिसरातील महिलांना शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनांतर्गत शिलाई मशीन, पिठाची गिरणी तसेच वॉशिंग मशीन मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडून विविध बचत गटांतील महिलांनी मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा केली होती. मात्र, वस्तू किंवा योजनेचा लाभ न मिळाल्याने महिलांनी फसवणूक झाल्याची तक्रार केली.

**विविध कलमांनुसार गुन्हा दाखल**

या प्रकरणी दिव्यज्योत संस्थेचे सचिव, संचालक आणि एजंट यांच्याविरोधात ’भारतीय न्याय संहिता’ (इछड) कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) तसेच ’ठेवीदारांचे हितसंरक्षण कायदा’ (चझखू) कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील अन्य संशयित संजय बोराळे आणि जयश्री बोराळे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने यापूर्वीच फेटाळले आहेत.

**सरकारी पक्षाचा युक्तिवाद :**

न्यायालयामध्ये सरकार पक्षातर्फे सहायक जिल्हा सरकारी वकील ॲड. रामनाथ शिंदे यांनी आक्रमक युक्तिवाद केला. आरोपी सुनीता कांबळे या संस्थेच्या अध्यक्षा असल्याने सर्व आर्थिक व्यवहारांची त्यांना पूर्ण माहिती असण्याची दाट शक्यता आहे. या प्रकरणातील इतर फरार आरोपींचा शोध घेणे आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

हा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी सुनीता कांबळे यांना ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील करत आहेत.

---

## बोरी गावासाठी २३ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.०८, बोरी (परभणी) :** बोरी गावातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या सुमारे २३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचा एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. या योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ४ टीएमएलडी क्षमतेच्या आधुनिक जलशुद्धीकरण केंद्राची (वॉटर ट्रीटमेंट प्लांट) चाचणी यशस्वी ठरली असून काही भागांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याचे परीक्षणही करण्यात आले आहे.

या योजनेमुळे बोरीसह परिसरातील सुमारे २५ हजार नागरिकांना नियमित, स्वच्छ आणि मुबलक पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणार आहे. धरणातील पाणी सुमारे १४ किलोमीटर अंतरावरून आणून त्याचे शुद्धीकरण करून नागरिकांना वितरित करण्यात येणार आहे. यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या तीव्र पाणीटंचाईच्या समस्येपासून नागरिकांची मोठ्या प्रमाणात सुटका होणार आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य अजय चौधरी यांनी सांगितले की, बोरी पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात आले असून वॉटर ट्रीटमेंट प्लांटची चाचणी यशस्वी झाली आहे. लवकरच गावकऱ्यांना शुद्ध व मुबलक पाणी उपलब्ध होईल. गावाच्या विकासाच्या दृष्टीने हा ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे केवळ पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण होणार नसून बोरीच्या भविष्यातील विकासालाही चालना मिळणार आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन योजनेची क्षमता निश्चित करण्यात आली असून योग्य देखभाल व व्यवस्थापन झाल्यास पुढील अनेक वर्षे गावाचा पाणीप्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार आहे.

---

## महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारा - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, मुंबई :** ‘महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा’मार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण १३१ पैकी पहिल्या टप्प्यात ६५ कामांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ‘महारेल’च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे महारेल मार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकही रेल्वे मार्गावर फाटक राहता काम नये. रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्रासाठी रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात; तसेच महानगरांमध्ये रेल्वे मार्गाच्या आजूबाजूला असलेले वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा भागात गरजेनुसार नागरिकांच्या सुलभ दळणवळणाकरिता पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात यावीत. मान्यता देण्यात आलेल्या ६५ कामांमधील संबंधित रस्त्यांवरील २५ हजार ते १ लाखापर्यंत ’टीव्हीयू’ (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या आणि कमीत कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. वाढते शहरीकरण लक्षात घेता शहरांमधील ८० रेल्वे पायाभूत सुविधांची कामे नियोजित करण्यात आली आहे. या कामांसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात यावी. समितीने नियोजित कामाविषयी पडताळणी करावी. त्यानंतर ते काम महारेल हाती घेईल. ही कामे पूर्ण झाल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या मागणीआधीच पायाभूत सुविधा मिळतील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलावर चौकाच्या ठिकाणी भविष्यातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. अशा ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्याच्या कार्यवाही करावी. अमरावती- बडनेरा मार्गावरील जुना रेल्वे उड्डाण पूल असून याठिकाणी नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात यावा. महारेलने कामांचे प्रधान्यक्रमानुसार टप्पे पाडावेत.

पायाभूत सुविधांच्या कामांसाठी हुडकोकडून कर्ज उपलब्ध करून घ्यावे. हुडकोने बँकांकडून कर्ज न घेता वेगळी व्यवस्था उभारून बाजारातील स्पर्धेचा अंदाज घेत शासनाला दिलेल्या कर्जावरील व्याज कमी आकारावे. त्याचबरोबर महारेल हे महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्यासाठी कार्यवाही गतीने पूर्ण करावी. महारेलमार्फत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे देयक राज्य शासनाकडून तातडीने अदा करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

---

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये : कृषिमंत्री

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी असल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी आवाहन केले आहे की, १२ जून ते १५ जून दरम्यानच्या पावसाचा अंदाज घेऊनच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. सध्यातरी मराठवाडा आणि खान्देश भागात सर्वदूर पाऊस पडणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पावसाचा योग्य अंदाज घेऊनच पेरणी करावी, घाई करू नये.

शेतकऱ्यांनी हवामान खात्याच्या (IMD) अधिकृत अंदाजावर आधारित निर्णय घ्यावा, जमिनीतील ओलावा, पावसाची सातत्यता आणि पुढील काही दिवसांचा अंदाज यांचा विचार करूनच पेरणी करणे अधिक योग्य ठरेल, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले.

दरवर्षी मान्सूनच्या सुरुवातीला काही भागांमध्ये अनियमित पाऊस होत असल्याने अनेकदा शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट ओढवते. हीच परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे १५ जूननंतर हवामान स्थिर झाल्यावरच पेरणी सुरू करणे शेतकऱ्यांच्या हिताचे ठरेल, असे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




## जननायक बिरसा मुंडा

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!


**– श्याम ठाणेदार**

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने धरती आबा म्हणजेच धरतीचे पिता म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले.

१५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले



त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला.

त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले.

बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक–सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ बिरसाईत म्हणून प्रसिद्ध झाली.

बिरसा यांच्या विचारांचा प्रभाव झपाट्याने वाढू लागला. लोक त्यांना केवळ समाजसुधारक म्हणून नव्हे, तर एक आध्यात्मिक नेता म्हणूनही पाहू लागले. त्यांच्या सभांमध्ये हजारो लोक सहभागी होत. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी सांगितले की कोणताही समाज आपल्या हक्कांसाठी जागरूक झाला तर त्याला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यांच्या संदेशामुळे आदिवासी समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली.

दरम्यान, ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासींच्या समस्या अधिकच वाढत होत्या. जंगलांवरील निर्बंधांमुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली होती. जमीनदार आणि सावकार यांच्या शोषणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली होती. आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर मजूर म्हणून काम करावे लागत होते. या परिस्थितीने बिरसा यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यांनी ओळखले की सामाजिक सुधारणांसोबतच राजकीय संघर्षही आवश्यक आहे. म्हणून त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.

याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली उलगुलान या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. उलगुलान म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी अबुआ दिशुम, अबुआ राज म्हणजे आपला देश, आपले राज्य हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

१८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली.

१८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले.

उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ब्रिटिश सरकारने या उठावाचे दमन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. अनेकजण संघर्षात शहीद झाले. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची कारागृहात ठेवण्यात आले. कारागृहात असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. ९ जून १९०० रोजी अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अधिकृत नोंदीनुसार त्यांचा मृत्यू कॉलऱ्यामुळे झाला असे सांगण्यात आले. तथापि, त्यांच्या मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांच्या अकाली निधनामुळे आदिवासी समाजाला मोठा धक्का बसला, परंतु त्यांच्या विचारांची ज्योत मात्र विझली नाही.

बिरसा मुंडा यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांनी अत्यंत कमी वयात आपल्या समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आदिवासी समाजात स्वाभिमानाची भावना जागवली. अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले. त्यांनी दाखवून दिले की संघटित समाज कोणत्याही शोषणकारी व्यवस्थेला आव्हान देऊ शकतो. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळात विविध धोरणांमध्ये दिसून आला. ब्रिटिश सरकारला आदिवासी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले. छोटानागपूर टेनन्सी कायद्यासारख्या उपाययोजनांमुळे आदिवासी जमिनींच्या संरक्षणासाठी काही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ एका आंदोलनापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडला.

स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे.

आजच्या काळात पर्यावरणसंवर्धन आणि शाश्वत विकास यांविषयी जगभर चर्चा होत आहे. आदिवासी समाजाची जीवनशैली आणि निसर्गाशी असलेले त्यांचे नाते हे शाश्वत विकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बिरसा मुंडा यांनी जंगल, जमीन आणि जल यांचे महत्त्व ओळखले होते. त्यांचा संघर्ष हा पर्यावरणीय न्यायाचाही संघर्ष होता. त्यामुळे आधुनिक पर्यावरणीय विचारसरणीतही त्यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे.

आज भारत सरकार आणि विविध राज्य सरकारांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, विमानतळ, शैक्षणिक संस्था आणि संशोधन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जाणारा 'जनजातीय गौरव दिवस' हा आदिवासी समाजाच्या योगदानाचा राष्ट्रीय गौरव करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. यामुळे नवीन पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होत आहे.

बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. सामाजिक न्याय, समानता, स्वाभिमान, पर्यावरणसंवर्धन आणि सांस्कृतिक अस्मिता यांची मूल्ये जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आदिवासी समाजाच्या विकासासाठी संवेदनशीलतेने कार्य करणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या संस्कृतीचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

९ जून हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्वातंत्र्य, समानता आणि न्याय यांसाठीचा संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही लाखो लोकांच्या हृदयात तेवत आहे. त्यांनी दाखवून दिले की संघर्षातून परिवर्तन घडवून आणता येते आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतीही गुलामी झुगारून देता येते. म्हणूनच ते केवळ इतिहासातील एक व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे शाश्वत प्रतीक आहेत.

धरती आबा बिरसा मुंडा यांचे जीवन भारतीय इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. त्यांचा संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील. आदिवासी स्वाभिमानाचे हे महानायक, स्वातंत्र्याचे अमर सेनानी आणि सामाजिक न्यायाचे अखंड दीपस्तंभ म्हणून त्यांचे नाव भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त या महान विभूतीस विनम्र अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि न्याय्य, समताधिष्ठित व मानवतावादी समाज घडविण्याचा संकल्प करूया. हाच त्यांना वाहिलेला खरा श्रद्धासुमनांचा हार ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## दोडका भाऊ

लाडकी बहिण मेळा
उपक्रम शुध्द चांगला
प्रोत्साहित होई नारी
सुखद सोहळा रंगला

अपार कष्टा दिलासा
स्वप्नांचाछोटा बंगला
हलकाहात मदतीचा
परिवार सुध्दा दंगला

बहिणींचे रूप घेऊन
जथ्यात टग्या घुसला
नात्यास डागाळू पाहे
विचारविचित्र कसला

सुख ओरबाडूनखाऊ
मलिदा थोडा दिसला
बाईचा मेकअप भला
रे रंगअंगाला फासला

चाणाक्ष ते आयोजक
भाऊ जाळ्या फसला
कु प्रवृत्ती पिसाळल्या
भलाकार्यक्रम धसला

हातात बांगड्या भरुन
करताअश्लिल नकला
तोटा आया बहिणींचा
विकूनखाल्याआकला

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# नुसते वृक्षारोपण नको, त्यांचे संगोपन गरजेचे

सद्या जिकडे पाहावे तिकडे वृक्षारोपनाचे महत्त्व वाढताना दिसते आहे. कोणत्याही व्यक्तीचा वाढदिवस असो अगर उत्तर कार्य यावेळी इतर खर्चाला फाटा देऊन झाडे लावण्याचे महत्व सांगून बऱ्याच लोकांना झाडे वाटली जातात. पण प्रत्यक्षात किती लोकांनी झाडे जगवली हा मात्र संशोधनाचा विषय आहे. नुकताच जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अनेकांनी वृक्षारोपण केले आहे.

मात्र यातील किती झाडे जगणारं हा संशोधनाचा विषय आहे दिवसेंदिवस वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. पावसाचे प्रमाण कमी होत आहे, प्रदूषण वाढत आहे. रोज एक आजार निर्माण होत आहेत. नद्या तर गटार गंगा झाल्या आहेत. निसर्गचक्र बदल्यामुळे अशा संकटाना सामोरे जावे लागत आहे हे सर्व ठाऊक असून सुद्धा याकडे गांभीर्याने कोणी लक्ष देत नाहीत. पण संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांनी

**वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे !**
**पक्षीही सुस्वरे आळवित !**

या प्रसिद्ध अभंगाद्वारे वृक्षाबद्दल प्रेमभावना व्यक्त करून जनजागृती केली आहे. तसेच प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी आपल्या गावी उभी केलेली देवराई निश्चितच प्रेरणादायी आहे यामध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे, सरकार दरवर्षी पावसाळा सुरू झाला की वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करून कोट्यवधी रुपयांची झाडे लावण्यावर भर देते पण नंतर त्याकडे लक्ष देत नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल ? निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो कधी नाही म्हणत नाही. तरी सुद्धा आपण त्याचा विचार करत नाही. झाडे लावा झाडे जगवा ! नुसता म्हणायचे नाही तर कृतीत आणणे गरजेचे आहे. आगामी काळात पावसाळा सुरु होईल त्या अनुषंगाने देशातील प्रत्येक राज्याच्या वनमंत्र्यांनी लागवडीचे उद्दिष्ट ठरवले असतील. ते पूर्ण करून त्याची जोपासना करणे गरजेचे आहे. आणि ही जबाबदारी प्रत्येकाची आहे. याची जाणीव ठेवली तर आपला देश सुजलाम् सुफलाम् व्हायला वेळ लागणार नाही.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### सरकारी कार्यालये आपल्या गावात पळवण्याचे पालकमंत्री विखे यांचे प्रयत्न - खा.लंकेचा आरोप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** शहरातील सरकारी कार्यालये जिल्ह्याच्या कोपऱ्यातील दूरवरच्या लोणीसारख्या ग्रामीण भागात पळवली जात आहेत. यातून अहिल्यानगर शहर विकासाच्या अस्मितेचा प्रश्न निर्माण होत आहे. या विरोधात आपण मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले असून हे प्रकार न थांबल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा खासदार नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत दिला. पालकमंत्री अधिकाराचा गैरवापर करत असे प्रकार करत असल्याचा आरोपही लंके यांनी केला.

लंके यांनी यासंदर्भात जलसंपदा व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाचे उदाहरण दिले. राष्ट्रीय महामार्गचे कार्यालय स्थलांतराविरोधात आपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन लक्ष वेधले. त्यांनी स्थलांतर थांबवण्याचा आदेश दिला, असेही लंके यांनी सांगितले. मंजूर झालेले सरकारी वैद्यकीय महाविद्यालय लोणीला पळवले जाणार होते, मात्र आपण विरोध केल्याने ते शहराजवळ स्थापन केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

**'असेच प्रकार सुरू राहिले तर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदही लोणी, शिर्डीकडे पळवले जाईल. यापूर्वी विमानतळासाठी शहराजवळील पिंपळगाव म ळवीची जागा निश्चित केली होती. परंतु तेही शिर्डीला पळवले गेले. आताही संरक्षण विभागाचा कारखाना शहराजवळ, राहुरी किंवा ढवळपुरी भागात सरकारी जागा उपलब्ध असूनही शिर्डीकडे नेण्यात आला. एक एक कार्यालये असेच शिर्डी,लोणीकडे जायला लागले तर सर्वच पक्षांनी या विरोधात एकत्र यायला हवे, असेही आवाहन खासदार निलेश लंके यांनी केले.'**

### स्मशानातील बांबूने उभारली सुरक्षा; भोगावती पुलाजवळ संरक्षण कठड्याची रिक्षा संघटनेची मागणी




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०८, पेण (रायगड) :** पेण-खोपोली मार्गावरील भोगावती नदी पुलाजवळील धोकादायक परिस्थितीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष सुरूच असल्याचा आरोप करत चावडी नाका तीन चाकी रिक्षा चालक-मालक संघटनेने अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला आहे. महिनाभरापूर्वी येथे झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता, तर दुसरा गंभीर जखमी झाला होता. मात्र त्यानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. भोगावती नदीजवळील हनुमान मंदिर परिसरात झालेल्या अपघातानंतर या ठिकाणी संरक्षण कठडा, सूचना फलक अथवा इतर सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र एक महिना उलटूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने चावडी नाका येथील तीन चाकी रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष अमोल घोटणे, पदाधिकारी व सदस्य यांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संघटनेच्या सदस्यांनी स्वखर्चाने आणि श्रमदानातून स्मशानभूम ीतील बांबू आणून पुलालगत तात्पुरता संरक्षण कठडा उभारला. या माध्यमातून संभाव्य अपघात टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला असून प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष अमोल घोटणे म्हणाले, या ठिकाणी पुन्हा कोणत्याही वाहनचालकाचा किंवा नागरिकाचा अपघात होऊ नये, हीच आमची भूमिका आहे. प्रशासनाने त्वरित क्रॅश बॅरिअर उभारून हा धोकादायक भाग सुरक्षित करावा. तसेच या मार्गावरून प्रवास करणारे लोकप्रतिनिधी आणि राजकीय पदाधिकारी यांनीही या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. रिक्षा संघटनेच्या या अनोख्या आंदोलनाची परिसरात चर्चा होत असून प्रशासन याची कितपत दखल घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### तब्बल २० वर्षापासून रक्तदानाचा महायज्ञ अविरत सुरू; यावर्षी शिबिरात १०० जणांनी केले रक्तदान



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०८, धाराशिव :** आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे सामाजिक बांधिलकीतून मागील २० वर्षापासून दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करतात. यावर्षी देखील नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. दिवसभरात एकूण १०० जणांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे आदिवासी विकास प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग घेतला.सुनील काळे हे सामाजिक क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तिमत्व आहेत. विविध सण, उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबविण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. शासनाच्या योजनांपासून वंचित असलेल्या आदिवासी पारधी समाजाला आधारकार्ड, रेशन कार्ड, जमिनीचे दाखले, बँक खाते, कर्ज योजना मिळवून देण्यासाठी त्यांनी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आज अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला असून बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले आहे. आदिवासी पारधी समाजाला शबरी आवास योजनेतून पक्की घरे उपलब्ध करून त्यांना हक्काचे घरकुल मिळवून दिले आहे. गतवर्षी कन्येच्या लग्नात सुद्धा त्यांनी घेतलेल्या शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले होते.मागील २० वर्षापासून ते वाढदिवसावर कोणताही वायफळ खर्च न करता रक्तदान शिबिराचे आयोजन करतात. कोरोना काळात दोन वर्षे रक्तदानाचा हा महायज्ञ खंडित होता. यावर्षीही त्यांनी शासकीय रक्तपेढीत रक्तदान शिबिराचे आयोजन केले. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत शेकडो युवकांनी शिबिरात सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

यावेळी आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर विभागाचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, डीवायएसपी मोतीचंद राठोड, सोलापूर जिल्हाध्यक्ष अनिल चव्हाण, नगरसेवक बापू पवार, सामाजिक कार्यकर्ते दत्ता काळे, संजू पवार, दादा काळे, पंकज काळे आदी उपस्थित होते.शासकीय रक्तपेढीतील प्रभारी अधिष्ठाता डॉ. स्वाती पांढरे डॉ. विवेक कोळगे, डॉ. सतीश तांदळे डॉ. दीपमाला करंडे, डॉ.विशाल नारायणकर, रक्तपेढी तंत्रज्ञ इंद्रजित साळवे, विठ्ठल कांबळे, अविनाश रणखांब, निलाक्षी जानराव, शिवकुमार जगताप, जनसंपर्क अधिकारी तिरुपती केंद्रे यांनी रक्त संकलन केले.

## बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी आ.दातेंचा पुढाकार



### १८६ कामगारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप

बांधकाम कामगार हे विकासाच्या प्रत्येक कामाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, कोणताही पात्र कामगार योजनांपासून वंचित राहू नये. यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा माझा मानस आहे.

**- आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासन राबवत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने तालुक्यातील १८६ बांधकाम काम गारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार दाते यांनी उपस्थित बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्य संच, गृहउपयोगी साहित्य संच, विवाह सहाय्य योजना, प्रसूती लाभ योजना, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना, गंभीर आजार उपचार सहाय्य, अपंगत्व सहाय्य, नैसर्गिक मृत्यू व अपघाती मृत्यू सहाय्य, वृद्धापकाळ पेन्शन, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत तसेच घरकुलासाठी विविध स्वरूपाचे लाभ उपलब्ध करून दिले जात आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी सर्व बांधकाम कामगारांनी अधिकृत नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

मतदारसंघातील बांधकाम काम गारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणारे आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कामगार मंत्री आकाश फुंडकर, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार.

## हिंगोली-परभणी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ; महायुतीचा विजय निश्चित?

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०८, परभणी :** हिंगोली-परभणी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. उपलब्ध पक्षीय संख्याबळ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडून आलेल्या सदस्यांची संख्या पाहता महायुतीचे पारडे जड असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. म हायुतीतील नाराज नेत्यांची समजूत काढण्यात वरिष्ठ नेते यशस्वी झाल्याने निवडणुकीपूर्वीचे अडथळे दूर झाल्याचे बोलले जात आहे.स्थानिक पातळीवर मंत्री तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार संतोष बांगर आणि महायुतीचे उमेदवार सईद खान यांनी विविध लोकप्रतिनिधींच्या भेटीगाठी घेतल्या. पाथरीचे आमदार राजेश विटेकर आणि गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर नाराजी दूर झाल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. त्यामुळे महायुतीच्या विजयाच्या शक्यता अधिक बळकट झाल्या आहेत.

पक्षीय संख्याबळ काय सांगते?

उपलब्ध आकडेवारीनुसार एकूण ४६५ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये प्रमुख पक्षांचे संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे :

- भाजप – ९९
- शिवसेना (शिंदे) – ७७
- राष्ट्रवादी काँग्रेस – १३१
- काँग्रेस – ५९
- उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना – ४३
- यशवंत सेना – २७
- जनसुराज्य पक्ष – १३
- राष्ट्रवादी समाज पक्ष – ५
- अपक्ष – ६




### सईद खान यांच्या विजयाची चर्चा

- वंचित – १
- पूर्ण शहर आघाडी – २
- जनता दल – २पंचायत समिती सभापती ९

महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे एकत्रित संख्याबळ ३०० पेक्षा अधिक असल्याने विजयासाठी आवश्यक मतसंख्या सहज उपलब्ध होऊ शकते, असे चित्र आहे.

विधानपरिषद निवडणुकीत मतदान कोण करते?

ही निवडणूक सर्वसामान्य नागरिकांसाठी नसते. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीत खालील लोकप्रतिनिधींना मतदानाचा अधिकार असतो :

- जिल्हा परिषद सदस्य
- पंचायत समिती सदस्य
- नगर परिषद सदस्य
- नगरपंचायत सदस्य
- पंचायत समिती सभापती
- महानगरपालिका सदस्य
- सर्व नगरपालिकेचे स्वीकृत सदस्य

या सर्व निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना म तदार म्हणून नोंदवले जाते. त्यामुळे या निवडणुकीत सामान्य मतदार थेट मतदान करत नाहीत.

मतदानाची प्रक्रिया कशी असते?

विधानपरिषद निवडणुकीत प्राधान्यक्रम मतदान पद्धती (झअॅशषशअॅशपींळरश्र तेींळपस ड्रींशा) वापरली जाते.

मतदार उमेदवारांना पसंतीक्रम देतो.

पहिली पसंती सर्वात महत्त्वाची असते.

आवश्यक कोटा पूर्ण करणारा उमेदवार विजयी ठरतो.

कोणत्याही उमेदवाराला आवश्यक मते मिळाली नाहीत तर दुसऱ्या पसंतीची मते विचारात घेतली जातात.

ही प्रक्रिया विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकांपेक्षा वेगळी असते.

उमेदवारांच्या भेटीगाठींना वेगनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच उमेदवारांनी मतदार असलेल्या सदस्यांच्या भेटीगाठींना वेग दिला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर परिषद आणि नगरपंचायतीतील सदस्यांशी संपर्क साधून पाठिंबा मिळवण्यासाठी राजकीय हालचाली वाढल्या आहेत.

अंतिम निकालाकडे लक्षपरभणी म हानगरपालिकेतील काही स्वीकृत सदस्यांची प्रक्रिया आणि काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाकी असल्या तरी सध्याच्या उपलब्ध संख्याबळाच्या आधारे हिंगोली-परभणी स्थानिक स्वराज्य संस्था म तदारसंघातील विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित मानला जात आहे.

मात्र मतदानाच्या दिवशी क्रॉस व्होटिंग किंवा अनपेक्षित राजकीय घडामोडी झाल्यास चित्र बदलू शकते. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष अंतिम मतदान आणि निकालाकडे लागले आहे.

## माजी सैनिकांची शिस्त आणि समाजसेवेचा आदर्श जनतेसमोर यायला हवा - शहाजी चालुक्य

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. ०८, धाराशिव :** भारतीय म ाजी सैनिक संघटना धाराशिव तालुका शाखेचे उदघाटन; तालुकाध्यक्षपदी नितीन माने यांची निवड भारतीय माजी सैनिक संघटना, धाराशिव तालुका शाखेचे उदघाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी संघटनेच्या तालुका कार्यकारिणी घोषीत करून जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्षपदी नितीन माने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्रारंभी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री. तुळजाभवानी तसेच फिल्ड मार्शल करिअप्पा यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी जय जवान, जय किसानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शक शहाजी चालूक्य होते. यावेळी राजेंद्र भागवत, अशोक सुरवसे, तानाजी जाधव, अरविंद कोकाटे, आबाजी जाधव, प्रभाकर हाके, धनंजय काळे, सत्यनारायण पुरी यांच्यासह जिल्हाभरातील म ाजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांना मार्गदर्शन करताना शहाजी चालुक्य म्हणाले, सेवानिवृत्तीनंतर समाजासाठी केलेले कार्य हे सैन्यातील कोणत्याही पदापेक्षा मोठे असते.

माजी सैनिकांनी आपली शिस्त, राष्ट्रनिष्ठा आणि सेवाभाव समाजहितासाठी वापरला पाहिजे. सैनिकांची शिस्त जनतेसमोर आदर्श म्हणून उभी राहिल्यास नव्या पिढीला प्रेरणा मिळेल.ते पुढे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिला माजी सैनिकांसाठीचा दवाखाना धाराशिव येथे उभारण्यात आला आहे. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या सहकार्याने माजी सैनिक कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाली.



स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये माजी सैनिकांना आरक्षण मिळावे यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गाव तिथे संघटनेची शाखा हा उपक्रम राबवून संघटना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे ही त्यांनी सांगितले.

कारगिल विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन करताना त्यांनी ध्वजनिधी संकलन म ोहिमेचाही उल्लेख केला. सैनिकांच्या वेतनवाढीबाबत अपेक्षित निर्णय न झाल्याची खंत व्यक्त करत त्यांनी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या सध्या सुरू असलेल्या धाडसी व पारदर्शक कारवाईचे कौतुक केले.

पतसंस्था, बचत गट आणि आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून म ाजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना बळ देण्याचे कार्य संघटनेकडून करण्यात येत असून उच्च शिक्षणासाठी विविध स्तरांवर मदत उपलब्ध करून दिली जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. कार्यक्रमात नवनियुक्त तालुकाध्यक्ष नितीन माने तसेच नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेंद्र बेंडकाळे यांनी केले.

# गुणवत्तेला योग्य जिद्दीची जोड मिळाल्यास अशक्य काहीच नाही – शिवाजीराव ठाणगे

## अभिनव खराबी याचे 'जेईई ॲडव्हान्स' परीक्षेत देदीप्यमान यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागात बुद्धिमत्तेची कमतरता नाही, गरज आहे ती फक्त योग्य ध्येयाची आणि जिद्दीची. आजच्या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक चौकटीबाहेर पडून उच्च व तांत्रिक शिक्षण घेण्याची अत्यंत गरज आहे. अभिनव खराबी याने देशातील अत्यंत कठीण अशा 'जेईई ॲडव्हान्स' परीक्षेत मिळवलेले यश हे आपल्या संपूर्ण परिसरासाठी दीपस्तंभासारखे आहे.

असे मत ज्येष्ठ नेते माजी चेअरमन शिवाजी ठाणगे यांनी व्यक्त केले.

देशातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठेची मानली जाणाऱ्या 'जेईई ॲडव्हान्स' (गएए अर्वीरपलशव) परीक्षेत टाकळी ढोकेश्वर येथील उद्योजक अशोक खराबी यांचे सुपुत्र कु. अभिनव अशोक खराबी याने नेत्रदीपक यश संपादन केले आहे. अभिनवने या परीक्षेत देशात ५३०७ वा रँक, तर ओबीसी (जइउ) प्रवर्गात ११६२ वा रँक मिळवून तालुक्याच्या वैभवात मोलाची भर घातली आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल टाकळी ढोकेश्वर येथे त्याचा सत्कार ज्येष्ठ नेते माजी चेअरमन शिवाजी ठाणगे व सेवानिवृत्त कृषी अधिकारी सोन्याबापू बर्वे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला होता.

यावेळी पुढे बोलताना ज्येष्ठ नेते शिवाजी ठाणगे म्हणाले, कोठ्यासारख्या ठिकाणी प्रतिकूल परिस्थितीत ही त्याने मिळवलेला रँक कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याने अभिनवच्या या यशाचा आदर्श आणि प्रेरणा डोळ्यांसमोर ठेवून कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. अपयशाची भीती न बाळगता जिद्दीने अभ्यास केल्यास ग्राम ीण भागातील मुलेही जागतिक पातळीवर चमकू शकतात, हा विश्वास अभिनवने दाखवून दिला



आहे.

कु.अभिनव खराबीचा सत्कार करण्यात आला यावेळी सेवानिवृत्त कृषी अधिकारी सोन्याबापू बर्वे, ज्येष्ठ नेते तसेच माजी चेअरमन शिवाजीराव ठाणगे, यांच्यासह माजी सरपंच सुभाष ठाणगे, शिक्षक नेते संतोष खामकर, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख अरुणराव ठाणगे, पळशी गावचे सरपंच प्रकाश राठोड, माऊली पतसंस्थेचे चेअरमन महादू भालेकर, उद्योजक संदीप खराबी, उद्योजक भाऊ रांधवण, पवन झावरे, माऊली खराबी, निवृत्ती बर्वे, जिजाबापू नरड, अशोक निमसे, सर्जेराव साळुंके, पत्रकार गणेश जगदाळे, युवा उद्योजक साई खराबी तसेच यावेळी टाकळी ढोकेश्वर परिसरातील अशोक खराबी यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पत्रकारांबाबत अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या एस.टी. अधिकाऱ्याचे निलंबन

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथील मध्यवर्ती बस स्थानकावर वाहतूक निरीक्षक शाहरुख खान याने प्रवासी व पत्रकार कुंभारदरे यांच्याशी व पत्रकारांबाबत अवमानकारक केलेल्या वक्तव्याबाबत घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ महाबळेश्वर शहरात पत्रकारांनी निषेध रॅली काढली होती. संबंधित प्रकरणामुळे एसटी प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

यावेळी संबंधित वाहतूक निरीक्षक शाहरुख खान याने प्रवाशांशी उद्धटपणे वागल्याचा आरोप घटना स्थळी उपस्थित प्रवाशांनी केला आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक पत्रकार कुंभारदरे यांनी याबाबत खान यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याशीही त्यांनी वाद घातला पत्रकारांबात अवमान कारक वक्तव्य केले.निषेध रॅली घटनेची माहिती शहरात पसरल्यानंतर स्थानिक पत्रकार संघटना, सामाजिक संस्था, प्रतिष्ठित नागरिकांनी निषेध व्यक्त केला.

संबंधित अधिकाऱ्याविरोधात कारवाई करण्याच्या मागणीसाठी शहरात रॅली काढण्यात आली. रॅली दरम्यान घोषणाबाजी करण्यात आली तसेच प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. महाबळेश्वर बस स्थानकावर पत्रकार बांधव दाखल झाल्यानंतर वाहतुक निरक्षक शाहरुख खान याने झालेल्या प्रकाराबाबत पत्रकार बांधवांची जाहीर माफी मागितली. निषेध रॅलीमध्ये महाबळेश्वर पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश काका पल्लोड, विलास काळे, संजय दस्तुरे, अजित जाधव, सचिन शिर्के, प्रेषित गांधी, अजित कुंभारदरे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे राहुल शेलार, रियाज मुजावर, संदेश भिसे,




**महाबळेश्वर पत्रकार एकजुटीचा दणका**

पत्रकारांना उर्मट व अपशब्द वापरणाऱ्या महाबळेश्वर एस.टी वाहतूक नियंत्रक शाहरूख खान याचे निलंबन

सह्याद्री पत्रकार संघाचे संदीप भाऊ देवकुळे, शरद झावरे, तसेच जितेंद्र कारंडे राजेश सोंडकर, मिलिंद काळे, पंचायत समिती सदस्य संजय शेलार, शिवसेना माजी जिल्हा प्रमुख राजेश कुंभारदरे, शिवसेना शहरप्रमुख विजय नायडू, शिवसेना शहर प्रमुख (उ.बा.ठा) राजेश गुजर, सचिन गुजर, शंकर ढेबे, वर्षा आरडे, मेघा चोरगे, गोपाल लालबेग, राजेश पंडित, तात्या साळुंखे, मनोज ताथवडेकर, वंचीत बहुजन आघाडी अध्यक्ष उत्तम भालेराव, आर.पी.आय आठवले गटाचे शहर प्रमुख विनय गायकवाड, दिपक वरपे, सचिन उगले, विविध पक्षांचे व संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# निरोगी आरोग्यासाठी सायकल चालवणे काळाची गरज; जागतिक सायकल दिन साजरा




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** जागतिक सायकल दिनानिमित्त लासलगाव पोलीस स्टेशन व लासलगाव सायकलिस्ट मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लासलगाव पोलीस स्टेशन ते मंजुळा मंगल कार्यालय पॅलेस दरम्यान काढण्यात आलेल्या या रॅलीच्या म ाध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरण आणि आरोग्याविषयी जनजागृती करण्यात आली.

**पर्यावरण संवर्धन आणि आरोग्याचा संदेश**

दरवर्षी ३ जून हा दिवस जगभरात 'जागतिक सायकल दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०१८ मध्ये या दिवसाची घोषणा केली होती. सायकल हे साधे, स्वस्त, विश्वासार्ह आणि प्रदूषणमुक्त वाहतुकीचे साधन आहे. नियमित सायकलिंगमुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते, वजन नियंत्रणात राहते, तसेच हृदयरोग व मधुमेहासारख्या गंभीर आजारांपासून बचाव होतो.

सायकलच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जन कमी होऊन पर्यावरण संवर्धनाला मोठी मदत होते, हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

**आठवड्यातून किमान एक दिवस सायकल वापरा!**

कार्यक्रमादरम्यान पोलीस प्रशासनातर्फे नागरिकांना आठवड्यातून किमान एक दिवस तरी सायकलचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. सायकल चालविणे हा केवळ एक व्यायाम नसून ती एक आरोग्यदायी व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग आहे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

**प्रमुख उपस्थिती**

हा उपक्रम लासलगाव पोलीस स्टेशनचेपोलीस निरीक्षक किरण साळुंखेवसहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटीलयांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरित्या पार पडला.

**रॅलीतील इतर सहभागी :**

लासलगाव मॉर्निंग ग्रुपचे सदस्यविविध गावांतील पोलीस पाटीललासलगाव महाविद्यालयातील सायकलप्रेमी विद्यार्थीस्थानिक पत्रकार बांधव आणि नागरिक (मोठ्या संख्येने उपस्थित)

# माथेरान प्लास्टिक मुक्त करण्यासाठी नगरपरिषदेचा पुढाकार युज अँड थ्रो प्लास्टिक रेनकोट बंदी; निर्णयाचे स्वागत

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०८, माथेरान :** पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील असलेल्या माथेरान शहराला प्लास्टिक मुक्त करण्याच्या उद्देशाने माथेरान नगरपरिषदेच्या १३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या नियोजन व पर्यटन समितीच्या बैठकीत युज अँड थ्रो प्लास्टिक रेनकोटवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असले तरी काही व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर व्यापारी वर्गाशी चर्चा करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे मीटिंग हॉल येथे विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीस नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, मुख्याधिकारी राहुल इंगळे, नियोजन व पर्यटन समितीचे सदस्य तथा नगरसेवक शिवाजी शिंदे, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष राजेश चौधरी तसेच व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मागील वर्षी मे ते सप्टेंबर या कालावधीत सलग पाच महिने पावसाळा सुरू होता. या काळात अंदाजे ७ ते ८ लाख पर्यटकांनी माथेरानला भेट दिली होती. यातील मोठ्या प्रमाणावर पर्यटकांनी कमी किमतीचे युज अँड थ्रो प्लास्टिक रेनकोट वापरले. हे रेनकोट ३० ते ८० रुपयांपर्यंत सहज उपलब्ध होत असल्याने पर्यटक ते माथेरानला येताना खरेदी करतात आणि परतीच्या प्रवासात अनेकदा टाकून देतात. परिणामी संपूर्ण परिसरात प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढून पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण होत आहे.

नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी सांगितले की, माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील पर्यटनस्थळ आहे. प्लास्टिकमुळे निसर्गाला मोठा धोका निर्माण होत असून स्वच्छ व प्लास्टिकमुक्त माथेरान हेच आमचे उद्दिष्ट आहे. युज अँड थ्रो प्लास्टिक रेनकोट बंदीचा निर्णय हा त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. विशेष म्हणजे माथेरानला इको सेन्सिटिव्ह झोनचा दर्जा मिळाल्यापासून येथे प्लास्टिक वापरावर निर्बंध आहेत. मात्र अनेक वर्षे विविध कारणांमुळे या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाले. आता नगरपरिषदेने याबाबत कठोर भूमिका घेतली असून पर्यावरण रक्षणासाठी ठोस उपाययोजना सुरू केल्या आहेत.यावेळी नगरसेवक तथा गटनेते शिवाजी शिंदे म्हणाले, नगरपरिषदेचे पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्लास्टिकचा वापर टाळणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने या निर्णयाला सहकार्य करून माथेरान स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा.

पावसाळ्यात माथेरानमधील अनेक ठिकाणी प्लास्टिक कचऱ्याचे ढीग दिसून येतात. त्याचा निसर्गावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे युज अँड थ्रो प्लास्टिक रेनकोट बंदीचा निर्णय पर्यावरण रक्षणासाठी अत्यंत आवश्यक असून या निर्णयाचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले बैठकीत मनोज खेडकर, शिवाजी शिंदे आणि रिजवान शेख यांनीही नगरपरिषदेच्या निर्णयामागील वस्तुस्थिती मांडत पर्यावरण संरक्षणासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

माथेरानची नैसर्गिक ओळख, स्वच्छता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी नगरपरिषदेने घेतलेल्या या निर्णयामुळे भविष्यात प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन पर्यटकांमध्येही पर्यावरणपूरक पर्यटनाबाबत जनजागृती होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# थोडक्यात

## चारठाणा ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वार्डनिहाय आरक्षण सोडत जाहीर



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०८, चारठाणा (परभणी) :** चारठाणा ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी वार्डनिहाय आरक्षण सोडत आज ग्रामपंचायत कार्यालयात पदाधिकारी, अधिकारी तसेच ग्राम स्थांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. आरक्षण सोडतीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडली. जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार वार्ड क्रमांक १ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी तीन जागा असून त्यापैकी दोन महिला व एक पुरुषासाठी आरक्षित आहे. वार्ड क्रमांक २ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी एक महिला व एक पुरुष, तर ओबीसी प्रवर्गासाठी एक महिला जागा आरक्षित करण्यात आली आहे. वार्ड क्रमांक ३ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी एक महिला व एक पुरुष तसेच ओबीसी प्रवर्गासाठी एक पुरुष जागा आरक्षित आहे.

वार्ड क्रमांक ४ मध्ये अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी एक महिला व ओबीसी प्रवर्गासाठी एक पुरुष जागा आरक्षित करण्यात आली आहे. वार्ड क्रमांक ५ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी एक महिला व एक पुरुष तसेच ओबीसी प्रवर्गासाठी एक महिला जागा राखीव आहे. वार्ड क्रमांक ६ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी तीन जागा असून त्यापैकी दोन पुरुष व एक महिला जागा आरक्षित करण्यात आली आहे.

आरक्षण सोडत जाहीर होताच संभाव्य इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या सोडत प्रक्रियेला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह २०२६ उत्साहात संपन्न




**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०८, अलिबाग (रायगड) :** भारत सरकारच्या फिट इंडिया मूव्हमेंट अंतर्गत रायगड जिल्हा पोलीस दल आयोजित, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह २०२६ – संडेज ऑन सायकल या उपक्रमास अलिबाग येथे उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवार, दि.७ जून २०२६ रोजी सकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या सायक्लोथॉनची सुरुवात पोलीस अधीक्षक कार्यालय, अलिबाग येथून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक किशोर साळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली.

ही सायकल रॅली पोलीस अधीक्षक कार्यालय, अलिबाग येथून वरसोली फाटा, बुरुमखान, महावीर चौक मार्गे अलिबाग बीचपर्यंत पार पडली. नागरिकांमध्ये आरोग्य, तंदुरुस्ती, पर्यावरण संवर्धन तसेच नशामुक्त भारत या संकल्पनेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान, स्पर्धा विश्व अकॅडमी, लायन्स क्लब, अलिबाग सायकल राइडर्स, अलिबाग पोलीस ठाणे तसेच विविध सामाजिक संस्था व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला विकास पाटील, अलिबाग सायकल राइडर्सचे अनिरुद्ध आठवले व सहकारी, सरस नर्सिंग होमचे डॉ. सिद्धार्थ कुलकर्णी, समाजसेवक प्रणित म्हात्रे, डॉ. मेघा घाटे, स्पर्धा विश्व अकॅडमीचे तपस्वी गोंधळी, उज्ज्वल माणुसकी समन्वयक ममता रुपेश म्हात्रे, माणुसकी प्रतिष्ठानचे तानाजी आगलावे तसेच अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार ऋषिकेश साखरकर, पोलीस हवालदार अमर जोशी, पोलीस हवालदार मिथुन मातेरे आणि पोलीस शिपाई संकेत पाटील यांच्यासह पोलीस अंम लदार व इतर मान्यवर उपस्थित होते. सर्व सहभागी नागरिकांनी उत्साहाने सायकल रॅली पूर्ण करून फिट इंडियाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये नियमित व्यायाम, सायकलिंग आणि निरोगी जीवनशैलीबाबत सकारात्मक जनजागृती झाली. सायक्लोथॉन २०२६ चा समारोप अलिबाग बीच येथे करण्यात आला. यावेळी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या वतीने सहभागी सायकलस्वारांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

## घरफोडीचा गुन्हा ४८ तासांत उघड; तलासरी पोलिसांची कामगिरी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०८, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील करंजगाव परिसरात घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या ४८ तासांत छडा लावत पालघर पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कारवाईत चोरीस गेलेली रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ३ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, करंजगाव येथील पाटीलपाडा परिसरात राहणारे फिर्यादी अजय नरेश घुटे यांनी ५ जून रोजी सकाळी घर बंद करून दुकानात गेले होते. त्यानंतर घरी परतल्यावर अज्ञात चोरट्याने घराच्या पाठीमागील दरवाजातून प्रवेश करून कपाटातील ३ लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी तत्काळ तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार तलासरी पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा शोध घेतला. तपासादरम्यान पोलिसांनी १६ वर्षीय विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेतले. चौकशीमध्ये त्याने घरफोडीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून ३ लाख रुपयांची रोख रक्कम तसेच १० हजार ५०० रुपये किंमतीचे दोन मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. अशा प्रकारे चोरीस गेलेला संपूर्ण ३ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विष्णू राजड यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाणे करीत आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलीस निरीक्षक अजय गोराड,प्रभारी अधिकारी तलासरी, पोलीस उपनिरीक्षक विष्णू राजड, पोलीस हवालदार संदीप नांगरे, पोलीस हवालदार अनिल सोनवणे, पोलीस शिपाई योगेश गुढे आणि तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कामगिरी यशस्वीरीत्या बजावली. घरफोडीचा गुन्हा अल्पावधीत उघड करून चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळवून दिल्यामुळे स्थानिक नागरिकांकडून तलासरी पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.